https://sarkarirecruitment.com/

# प्रेस–नोट

# नांदेड जिल्हा होमगार्ड मध्ये दि 25/03/2019 पासुन नाव नोंदणी

## 172 पुरूष व 153 महिला होमगार्ड पदासाठी नोंदणी प्रकिया

दिनांक 25/03/2019 नांदेड जिल्हा मुख्यालया अंतर्गत नांदेड,बिलोली,हदगाव,मुखेड,देगलुर, कंधार,किनवट,भोकर पथकातील पुरूष 172 व महिला 153 होमगार्ड पदाच्या रिक्त जागासाठी दि 25/03/2019 ते 27/03/2019 या कालावधित नाव नोंदणी करण्यात येणार आहे. अशी माहिती मा. जिल्हा समादेशक तथा अप्पर पोलीस अधिक्षक (डॉ.अक्षय शिंदे) भा.पो.से यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

रिक्त अनुषेश नांदेड पुरूष–99 व महिला–49 बिलोली पुरूष–17 महिला–27 हदगाव पुरूष–15 महिला–24 मुखेड पुरूष–4 महिला–11 देगलुर पुरूष–8 महिला–6 कंधार पुरूष–16 महिला–20 किनवट पुरूष–4 महिला–5 भोकर पुरूष–9 महिला–11 होमगार्डच्या रिक्त पदासाठी ही नाव नोंदणी करण्यात येणार आहे. या नाव नोंदणीसाठी उमेदवारांची वयोमर्यादा 20 ते 50 वर्ष अशी आहे.उमेदवार हा किमान इयत्ता 10 वी उत्तीर्ण असावा. पुरूष उमेदवारांसाठी उंची किमान 162 से.मी असावी छाती न फुगवता 76 से.मी आणि फुगवुन 81 से.मी असावी, 1600 मीटर धावणे व गोळा या मैदाणी चाचणी त्यांना अनिर्वाय आहे.तसेच उमेदवार सुशिक्षित बेरोजगार नसावा.

महिला उमेदवारांसाठी उंची किमान 150 से.मी असावी 800 मीटर धावणे व गोळा फेक अशी मैदाणी चाचणी घेण्यात येईल.उमेदवारास या चाचणी मध्ये उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रकारात कमीत कमी 40 टक्के गुण आवश्यक राहतील या व्यतीरीक्त आयटीआय प्रमाणपत्र खेळाचे कमीत कमी जिल्हास्तरीय प्रमाणपत्र, माजी सैनीक प्रमाणपत्र, एन.सी.सी. बी किंवा सी प्रमाणपत्र नागरीसंरक्षण सेवेत असल्याचे प्रमाणपत्र,जडवाहन चालविण्याचा परवाना, या प्रमाणपत्र धारकांना तांत्रिक अहरता गुण दिल्या जातील.

दि 25/03/2019 रोजी सकाळी 8:00 वाजता पोलीस मुख्यालय कवायत मैदाण वजिराबाद नांदेड येथे नाव नोंदणी करण्यात येईल.सकाळी 8:00 ते दुपारी 16:00 या कालावधीत कादपत्राची तपासणी व शारीरीक चाचणी घेण्यात येईल.नाव नोंदणीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना 10 वी पास असल्याचे मुळ प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे 3 कलर फोटो रहिवासी असल्याचा सक्षम पुरावा,इतर शैक्षणिक कादपत्रे झेरॉक्स प्रतिसह सोबत आणावीत.शारीरीक चाचणीत पात्र ठरलेल्या पुरुष/महिला उमेदवारांची मैदानी चाचणी दि 26 मार्च रोजी सकाळी 5:00 पासुन शहिद भगतसिंघ चौक असर्जन नाका विष्णुपुरी रोड नांदेड येथे घेण्यात येईल.

होमगार्ड हि निष्काम सेवा असलेले संघटण आहे, होमगार्ड स्वयंसेवकांना कुठल्याही नियमीत पगार किंवा मानधन दिल्या जात नाही, कर्तव्य बजावल्या नंतरच कर्तव्य भत्ता दिला जातो.नाव नोंदणीसाठी आलेल्या कोणत्याही उमेदवाराला कुठलाही प्रवास भत्ता दिला जानार नाही.शारिरीक किंवा मैदानी चाचणीच्या वेळी कोणताही अपघात घडल्यास किंवा शारिरीक दुखापत झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी हि संबंधित उमेदवाराची राहील.

काही तांत्रीक अथवा अपरिहार्य करणास्तव नाव नोंदणी प्रकिया रद्द करण्याचा अधिकार जिल्हा समादेशक यांना राहिल हि.नाव नोंदणी प्रकिया संपुर्ण पणे मोफत आहे सदर नाव नोंदणीसाठी जर कोणी पैशाची मागणी करित असेल तर लाचलूचपत प्रतिबंधक शाखा नांदेड यांच्याकडे 02462–253312 या दुरध्वनी व अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड–02462–232961 जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय नांदेड–02462–256261 या कमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन जिल्हा समादेशक तथा अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. अक्षय शिंदे यांनी प्रशिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

(डॉ.अक्षय शिंदे) भा.पो.से.
जिल्हा समादेशक होमगार्ड तथा
अप्पर पोलीस अधिक्षक नांदेड

Scanned by CamScanner